आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२८ एप्रिल २०२४ - रविवार

मणीपूरमधल्या आऊटर मणीपूर लोकसभा मतदारसंघातल्या सहा मतदारसंघात पुन्हा मतदान घेण्याचा आदेश निवडणूक आयोगानं दिला आहे. आयोगानं ३० एप्रिल रोजी सकाळी ७ ते संध्याकाळी ४ या वेळात मतदान घ्यायला सांगितलं आहे. उखरुल जिल्ह्यातल्या पाच आणि सेनापती जिल्ह्यात एका मतदारसंघात २६एप्रिलला झालेलं मतदान आयोगानं रददबातल ठरवलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेस खोट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा आरोप प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. ते आज कर्नाटकात बेळगावी इथं प्रचारसभेला संबोधित करत होते. केंद्रसरकारनं मंजूर केलेल्या भारतीय न्याय संहितेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती सुधारेल, असं ते म्हणाले. आपल्या सरकारने छोट्या शेतकऱ्यांना मदत केली, शेतकरी उत्पादक संघांच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांत निविष्ठांच्या किंमतीत घट आणि शोतमालाला खुली बाजारपेठ मिळाली असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी उत्तर मुंबईला उत्तम मुंबई बनवण्याचा आपला निर्धार असल्याचं भाजपा नेते पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित बातमीदारांशी बोलत होते. उत्तर मुंबईला आधुनिक तंत्रज्ञांवर आधारित वाहतूक व्यवस्था प्रदान करणं आणि उत्तर मुंबई प्रदूषणमुक्त करणं याला प्राधान्य दिलं जाईल, असं त्यांनी संगितलं.

**<><><><><>**

देवेंद्र फडणवीस यांनी आज बार्शी इथं उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. प्रधामंत्री

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शेतकऱ्याला अडचणीत येऊ देणार नाही असा निर्धार असल्याचं सांगत मत देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यात निजामपूर इथे आज इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांची प्रचार सभा झाली. नरेंद्र मोदी यांच्यामुळे देश हुकूमशाहीकडे वळत असल्याचा आरोप गीते यांनी यावेळी केला. आदिवासी बांधवांच्या खनिज संपन्न जागा बळजबरीनं ताब्यात घेऊन त्या अडाणीला देऊन, आदिवासींना हद्दपार करायचा भाजपाचा कट आहे, असं ते म्हणाले. मतदार आपल्याला विजयी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या मिरजोळे एमआयडीसी इथल्या मतमोजणी  केंद्राला भेट देऊन पहाणी केली. कुवारबाव इथल्या सामाजिक न्याय भवन इथल्या इव्हीएम वाटप केंद्रालाही त्यांनी भेट दिली. निवडणूक निर्णय अधिकारी एम देवेंदर सिंह यांनी यावेळी त्यांना सविस्तर माहिती दिली.

**<><><><><>**

तिसऱ्या टप्प्यातला मतदानाच्या पार्श्वभूमीवर, रायगड जिल्ह्यात पोलीस पथकानं खोपोली शहर, खोपोली शिळफाटा इथं पथसंचलन केलं. मावळ लोकसभा मतदारसंघात शांतता आणि सुव्यवस्था कायम राहावी आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत व्हावा या उद्देशानं हे पथसंचलन केलं गेलं.

**<><><><><>**

बीड जिल्हा निवडणूक प्रशासनानं आज मतदान जागृतीसाठी अंबाजोगाई, परळी आणि माजलगावसह विविध ठिकाणी सायकल रॅलीचं आयोजन केलं. निवडणूक शांततेत पार पाडावी, आणि सर्वांनी आपला मताधिकार बजावावा, असं आवाहन या रॅलीतून करण्यात आलं.

<><><><><>

रत्नागिरी जिल्हा पोलीस दलातल्या १७ पोलीस अंमलदारांना २०२३ या वर्षातल्या प्रशंसनीय सेवेबद्दल पोलीस महासंचालकांचं सन्मानचिन्ह जाहीर झालं आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये दोन महिला अंमलदारांचाही समावेश आहे.

<><><><><>

मे महिना लग्नसराईचा असल्यानं राज्य परिवहन महामंडळानं बसफेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी अकोला जिल्ह्यातील प्रवाशांनी केली आहे. महिला सन्मान योजनेअंतर्गत एसटी बस भाड्यात ५० टक्के सूट आणि ७५ वर्षांवरील प्रवाशांसाठी शून्य तिकीट योजना सुरु असल्यानं एसटीतून प्रवास करणाऱ्यांची संख्येतही वाढ झाली आहे.

<><><><><>

कोकणासह, केरळ, माहे, कर्नाटक आणि आंध्रची किनारपट्टी या प्रदेशांमध्ये उष्म्याबरोबरच दमट हवामान येते दोन तीन दिवस टिकून राहिल, असा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. पश्चिम बंगालमधला गंगेजवळचा प्रदेश आणि ओदिशात अतीतीव्र उष्म्याची लाट असल्याचा इशाराही विभागानं दिला आहे.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण लातूर आणि बीड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

//<><><><><>//

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ एप्रिल २०२४ - रविवार